~~नियमित~~ मोघम नियमीत फौजदारी खटला क्र.६१२/२०२५

**साक्षीदाराची भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम २२३ प्रमाणे पडताळणी**

**माझे नावः** राऊसाहेब बबन सावंत,

**वयः** ६२ वर्ष, **धंदाः** मजुरी,

**राहणारः** सावंत वस्ती, नांदुरढोक, ता.वैजापुर,जि.औरंगाबाद.

.................................................................................................

**शपथेवर कथन करते की,**

मी प्रस्तुतची तक्रार यमाजी बबन सावंत व मंदाबाइ यमाजी सावंत यांच्याविरुध्द दाखल केली आहे. ते माझे भाऊ व भावजई आहेत. घटना दि.१०.०७.२०२५ रोजी सकाळी ११ ते १२.३० वाताच्या दरम्यान गट नं.१३७ वरील सामुदायीक विहीरीजवळ घडली. मी विहीरीवरील मोटार चालु करण्यासाठी गेलो. त्यावेळी माझा भाऊ मला म्हणाला की इकडे यायचा काही संबंध नाही, हात पाय तोडेल, तुझा विहीरीशी काही संबंध नाही. माझी भावजई मला म्हणाली की तुझ काय आहे, इथे कशाला येतो. विहीरीवर जाण्यास रस्ता नाही. मोठ्या भावांना देखील असाच त्रास देवुन दोन व्यक्तीत विहीरी खंदायला लावल्या. तो मला विहीवरुन दामटायचा प्रयत्न करतो. त्यानंतर माझी पत्नी त्याठिकाणी आली व सोडवासोडव करुन मला घरी आणले. माझ्या भावाने माझ्या विरुध्द पोलीस स्टेशनला मला शिवीगाळ करुन माझ्याविरुध्दच तक्रार केली होती म्हणुन मी त्याच्याविरुध्द क्रॉस तक्रार केली. त्यानंतर मी भितीपोटी कोर्टात केस नोंदविली. माझ्या भावावर व भावजईवर नियमानुसार कारवाई करण्यात यावी.

**राऊसाहेब बबन सावंत,**
फिर्यादीची सही / अंगठा.
राऊसाहेब सावंत

**श्रवणोत्तर स्विकृत,**

18/09/2025
एन. एस. काळे
**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, वैजापुर.**

**दिनांकः** १८/०९/२०२५.
**वैजापूर**